४७ २५

अतिरिक्त वेतन/विशेष वेतन
मंजूर करण्याबाबतची कार्यपध्दती

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक-पीएवाय १२८४/सीआर-७००/एसईआर-७.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १२-११-१९८४. CR1984111201

पहा:- १] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीएवाय १२७७/
सीआर-९९३/एसईआर-३, दिनांक १६-११-१९७८.

२] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीएवाय-१२७९/
सीआर-६०४/एसईआर-३, दिनांक १९-७-१९८०.

परिपत्रक :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-पीएवाय १२७७/सीआर-९९३/एसईआर-३, दिनांक १६-११-१९७८ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम १९८१ मधील नियम ५६ खाली अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्याच्या शक्ती विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख यांना सहा महिन्यापर्यन्त तसेच मंत्रालयीन विभागाना एक वर्षापर्यन्त प्रदान करण्यात आल्या आहेत. सदर आदेशामधील परिच्छेद ४ अन्वये एक वर्षाहून अधिक कालावधीसाठीचे अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करण्यासाठीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांना संमतीसाठी दाखविणे जरुरीचे असते.

२. ज्या प्रकरणी अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी सहा महिन्यापेक्षा अधिक होत असेल तसेच ज्या प्रकरणी अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी एक वर्षाहून अधिक होत असेल तर अशा प्रकरणी विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख तसेच प्रशासकीय विभाग यांनी विशेष वेतन मंजूरीबाबत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार विशेष वेतन मंजूर करण्यासाठी कोणती पध्दत अवलंबावी याबाबत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. सदर मुद्यांबाबत शासनातर्फे विचार विनिमय करण्यात आला असून त्याबाबत शासन खालीलप्रमाणे निदेशित करीत आहे :-

[अ] ज्या प्रकरणी अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी सहा महिन्यापेक्षा अधिक होत असेल तर अशा प्रकरणी विभाग प्रमुखांनी/प्रादेशिक प्रमुखांनी आपल्या अधिकारात सहा महिन्यापर्यन्तच्या कालावधीसाठीचे विशेष वेतन मंजूर करून सहा महिन्याच्या पुढील कालावधीसाठीचे विशेष वेतन मंजूर करण्याचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाला पाठवावा. संबंधित प्रशासकीय विभागाने पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी विशेष वेतन मंजूर करावे व त्या आदेशामध्ये पहिल्या सहा महिन्याच्या कालावधीसाठीचे विशेष वेतन विभाग प्रमुखाने/प्रादेशिक प्रमुखाने मंजूर केल्याचा उल्लेख करावा.

[कृ. मा. प. ]



पीएस/२०९८५.

[ब] अतिरिक्त कार्यभाराचा एकूण कालावधी एक वर्षाचे वर होत असल्यास प्रशासकीय विभागाने सहा महिन्याचे वरील परंतु एक वर्षापर्यन्तचे विशेष वेतन वर नमूद केलेल्या पध्दतीने मंजूर करून एक वर्षाचे वरच्या कालावधीसाठी विशेष वेतनाच्या मंजूरीसाठी सदर प्रकरण सामान्य प्रशासन विभागामार्फत वित्त विभागाकडे पाठवून ह्या दोन्ही विभागांची अनुमती मिळाल्यानंतर एक वर्षापुढील कालावधीसाठीचे विशेष वेतन मंजूरीचे आदेश काढावेत.

३. महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम १९८१ च्या नियम ५६ अन्वये अतिरिक्त वेतन मंजूर करण्याचे प्रकरणीसुध्दा वर नमूद केलेली पध्दत अवलंबविण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ना. श्री. जोशी,
सहाय्यक सचिव, वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल, [लेखा] महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, [लेखा] महाराष्ट्र-२, नागपूर.
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा] महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा] महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
x प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई.
x प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई.
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
x प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड फाईल, वित्त विभाग-एसईआर-७,

x पत्राद्वारे

१९८४ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

---

एच-५८६[१०००+७-११-८४]

पीएस/२०८८५.